# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी

प्रस्तावना :-

विषय:- भिवंडी महानगरपालिका व बि.एन.एन. महाविद्यालय भिवंडी यांचे सोबत सांमजस्य करार करणेबाबत.

भिवंडी महानगरपालिका कार्यक्षेत्रातील व-हाळादेवी तलाव हे ऐतिहासिक व नैसर्गिक संपत्ती लाभलेली तलाव आहे. म्हणुन व-हाळादेवी तलाव हे महत्त्वाचे साधनसामुग्री असुन याचा उपयोग भिवंडीतील नागरिकांना होत आहे. सदर तलावाचे संवर्धन व सुशोभिकरण आणि स्वच्छता जतन करणे महत्त्वाचे आहे. याकरीता तज्ञ सल्लागार श्री. दिलीप के. काकवीपुरे, प्राध्यापक बी.एन.एन. महाविद्यालय, तथा सदस्य प्राणी शास्त्रज्ञ मंडळ, मुंबई विद्यापिठ यांनी माहे डिसेंबर,२०२१ पासुन सातत्याने पाहणी तसेच वेळोवेळी तलावातील नैसर्गिक ईको-सिस्टिम, विविध जलचर, जलमय प्राणी यांचा सखोल अभ्यास करुन तलावात उत्पन्न होणा-या मायक्रोसिस्टिस सायनो बॅक्टेरिया व त्यामुळे निर्माण होणारी दुर्गंधी, पि.ओ.पी. गणेशमुर्तीचे विघटन करुन त्या पासुन खत निर्माण करणे, वर्मी कंपोस्ट खत तयार करणे, प्रदुषण यावर उपाययोजना करणेबाबत मोलाचा सहकार्य विनामोबदला करत आहेत. तसचे पुढील कार्याकरिता काही सहयंत्र व रसायने याबाबत मागणी केलेली आहे. त्यानुसार भिवंडी शहरातील जैव- विविधतेचे जतन, माझी वसुंधरा अभियान- ४.० अंतर्गत सार्वजनिक उपक्रम व विविध कार्यक्रम राबविणे करीता सदर सांमजस्य करार करणे बाबतच्या प्रस्तावास मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांचे मंजुरी करिता सादर करण्यांत आले आहे. सदर प्रस्तावास शहर अभियंता, अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारसी प्रमाणे मा. प्रशासक तथा आयुक्त महोदय यांनी त्यास दिनांक १३ /११/२०२३ रोजी मान्यता दिलेली आहे. सदर कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३(क) अन्वये प्रशासकीय ठराव करणेकामी मंजुरीस्तव सविनय सादर.

ठराव क्रं. :- २८९ दिनांक :- २१/११ /२०२३

भिवंडी महानगरपालिका कार्यक्षेत्रातील व-हाळादेवी तलाव हे ऐतिहासिक व नैसर्गिक संपत्ती लाभलेली तलाव आहे. म्हणुन व-हाळादेवी तलाव हे महत्त्वाचे साधनसामुग्री असुन याचा उपयोग भिवंडीतील नागरिकांना होत आहे. सदर तलावाचे संवर्धन व सुशोभिकरण आणि स्वच्छता जतन करणे महत्त्वाचे आहे. याकरीता तज्ञ सल्लागार श्री. दिलीप के. काकवीपुरे, प्राध्यापक

(कृ.मा. पहा)

बी.एन.एन. महाविद्यालय, तथा सदस्य प्राणी शास्त्रज्ञ मंडळ, मुंबई विद्यापिठ यांनी माहे डिसेंबर,२०२१ पासुन सातत्याने पाहणी तसेच वेळोवेळी तलावातील नैसर्गिक ईको-सिस्टिम, विविध जलचर, जलमय प्राणी यांचा सखोल अभ्यास करून तलावात उत्पन्न होणा-या मायक्रोसिस्टिस सायनो बॅक्टेरिया व त्यामुळे निर्माण होणारी दुर्गंधी व पि.ओ.पी. गणेशमुर्तीचे विघटन करून त्या पासुन खत निर्माण करणे, वर्मी कंपोस्ट खत तयार करणे, प्रदुषण यावर उपाययोजना करणेबाबत मोलाचा सहकार्य विनामोबदला करत आहेत. तसचे पुढील कार्याकरिता काही सहयंत्र व रसायने याबाबत मागणी केलेली आहे. त्यानुसार भिवंडी शहरातील जैव- विविधतेचे जतन, माझी वसुंधरा अभियान- ४.० अंतर्गत सार्वजनिक उपक्रम व विविध कार्यक्रम राबविणे करीता महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, कडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)/नवि-१४, दिनांक ०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषःत कलम ४५२ अ (१अ)व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकरानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमान्वये वरिल नमुद कामाच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देत आहे.

(अजय वैद्य)
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

PHOTO COPY